# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १२/०१/२०२५ (रविवार) सकाळ**

---

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद

पोलीस स्टेशन जलालखेडा :– दिनांक ०८/०१/२०२५ रोजी यातील उमंग (शारदा) बार भारसिंगी येथील बार मालक फिर्यादी नामे पंकज चंद्रकुमार जैस्वाल यांनी पोस्टेला माहीती दिली कि, अंदाजे रात्री २२/५५ वा दरम्यान त्यांच्या बारवर दोन ईसम दुप्पटा बांधुन स्प्लेंडर मोंटार सायकलने आले व काउन्टरवर येवुन बार मालक यांचेवर गावठी कट्टा (देशी बंदुक) जिवे मारण्याच्या उददेशाने ताणुन म्हणालें की, मी हेमराज बाभुळकर आहे, असे म्हणताच बार मालक यांनी तो कटटा हिसकवुन घेतला व त्यांचे बारवर काम करणारा संजय याला म्हणाले की, पोलीसांना फोन कर असे म्हणताच ते दोन्ही ईसम पळुन गेले ते दोन्ही ईसम हे काटोल, लोहारी सावंगा किंवा वरूड मार्ग पळाले असावे असे बार मालक सांगत आहे. अशा फिर्यादिच्या वरून पोस्टे जलालखेडा येथे अप क्र. ०३/२५ कलम १०९, ३३३, ३५१ (२), ३ (५) BNS सहकलम ३, २५ आर्म ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद केला होता.

सदर गुन्हयाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पथक करीत असताना दि. १२/०१/२०२५ रोजी सदर गुन्हयातील आरोपी नामे हेमराज बाभुडकर रा. तीनखेडा यांचा स्थानिक गुन्हे शाखेचे पथक काटोल डिव्हिजन मध्ये शोध घेत असता मुखबीरचे खबरेच्या आधारे व तांत्रिक माहिती वरुन सदर आरोपी **हेमराज गजानन बाभुडकर वय ३८ वर्ष रा. तीनखेडा** हा सारणी जिल्हा बैतुल मध्यप्रदेश येथे नगर पालिका या एरिया मध्ये लपून बसल्याचे खात्रीशीर माहिती पडल्यावर सारणी पोस्टे स्टाफ तसेच स्थानिक गुन्हे श्शाखेच्या पथकाने सदर आरोपी यास सारणी येथून ताब्यात घेतले. सदर आरोपी यांची मेडिकल तपासणी करून पुढील तपासकामी पोलीस स्टेशन जलालखेडा यांचे ताब्यात देण्यात आले.

## अकोला जिल्हा, पोलीस स्टेशन खदान येथील फरार आरोपी ज्यावर अकोला पोलीस यांनी ०३ लाखाचे बक्षीस ठेवले आहे त्याला स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांनी केले अटक

मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांचे आदेशान्वये दिनांक १२/०१/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस ठाणे जलालखेडा अप क्र. ३/२५ कलम १०९, ३३३, ३५१ (२) ३ (५) BNS सहकलम ३, २५ आर्म ॲक्ट मधील आरोपी नामे हेमराज बाभुडकर रा. तीनखेडा यांचा सारणी जिल्हा बैतुल (मध्यप्रदेश) येथे शोध घेत असता मुखबीर द्वारे खबर मिळाली की पोस्टे खदान अकोला अप क्र. ६२८/२४ कलम १०९, ३(५) BNS चे गुन्ह्यातील पाहीजे **आरोपी नामे मुस्ताक सिमनानी अब्दुल खालीक हाफीजजी उर्फ सबरी वय ५० वर्षे, रा. मोमीनपूरा नागपूर** ज्यावर अकोला पोलीस **यांनी ०३ लाखाचे बक्षीस ठेवले आहे.** तो नगर पालिका या वस्ती मध्ये राणी खान या महिलेचे घरी लपून बसला आहे. अशा माहिती वरून स्टाफ यांनी सापळा रचुन राणी खान हिचे घरून सदर आरोपी यास आपले ताब्यात घेतले. आरोपीची वैद्यकीय तपासणी करून पुढील कार्यवाही करीता पोस्टे अकोला यांचे ताब्यात देण्यात आले.

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद
## उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय रामटेक विभाग यांची कारवाई

दिनांक १२/०१/२०२५ चे ०६.३० वा. सुमारास श्री रमेश बरकते उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक यांचे आदेशाने उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय रामटेक विभाग येथील स्टाफ अवैध धंदेकामी पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, रामटेक तुमसर हायवे रोडवरून शिवनी (भोंडकी) ते अरोली रोडनी अवैधरीत्या विनापरवाना रेतीची वाहतूक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून रामटेक तुमसर हायवे रोडवरून शिवनी (भोंडकी) ते अरोली रोडनी नाकाबंदी केली असता शिवनी भोंडकी कडुन अडेगावकडे एक पिवळया रंगाचा भारत बेंझ कंपनीचा १० चक्का टिप्पर क्र. एम एच—४९/ए टी —४४४७ चा चालक आरोपी नामे— दुर्गेश त्रिलोकचंद कुरील, वय २७ वर्ष रा. रविनगर येरखेडा कामठी जि. नागपूर यास स्टाफने थांबवून पाहणी केली असता त्याचेकडे वैध परवाना पेक्षा ०४ ब्रास अधिक रेती आढळुन आल्याने सदर वाहनात एकुण अंदाजे ०८ ब्रास रेती मिळून आल्याने आरोपीच्या ताब्यातून १० चक्का टिप्पर क्र. एम एच—४९/ए टी —४४४७ किंमती ५२,००,०००/— रू. मध्ये ०८ ब्रास रेती किमती ४०,०००/— रू. असा एकुण ५२,४०,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपी चालक नामे— दुर्गेश त्रिलोकचंद कुरील, वय २७ वर्ष रा. रविनगर येरखेडा कामठी जि. नागपूर व मालक नामे— सतिश क्रिष्णराव गायधने, वय ४५ वर्ष, रा. वाठोडा नागपूर यांचे विरुद्ध पोलीस ठाणे अरोली येथे कलम ३०३(२), ४९ भारतीय न्याय संहिता सहकलम ४८(७), ४८ (८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम—१९६६, सहकलम ४, २१ खानी आणि खनीजे (विकास आणि नियमन) अधिनियम १९५७, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतीबंधक अधिनियम १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

पोलीस माहिति कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर